## प्रकरण पाचवे

# उपसंहार

# प्रकरण पाचवे
# उपसंहार

व्यंकटेश माडगूळकर हे नवकथेचे चौथे मानकरी म्हणून ओळखले जातात. कथा, कादंबरी, नाटक, ललितगद्य, प्रवासवर्णन असे अनेक साहित्यप्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळलेले आहेत. ग्रामीण कथेतील त्यांची कामगिरी लक्षणीय अशी आहे. व्यंकटेश माडगूळकरांच्या साहित्यामधील कथा या वाङ्.मय प्रकारातील प्राणिकथा अभ्यासासाठी निवडून या प्राणिकथांचे विशेष, त्यातील वेगळेपण, दर्जेदारपणा, मनुष्य–प्राणी सहसंबंध, निसर्गचित्रण, प्राण्यांवर केलेल मानवी जीवनाचे आरोपण, प्राण्यांचे मनोविश्लेषण, कथांची निवेदनशैली असे या प्राणिकथांचे विशेष नोंदविण्यासाठी, प्राणिकथांचे निराळेपण स्पष्ट करण्यासाठी या प्रबंधिकेची मांडणी केलेली आहे.

या प्रबंधिकेची मांडणी करत असताना पहिल्या प्रकरणामध्ये सुरुवातीला प्रास्ताविक लिहून विषयाचे महत्व आणि प्रबंधिकेचा हेतू स्पष्ट केलेला आहे. तसेच ग्रामीण कथा म्हणजे काय? ते सांगून ग्रामीण कथेचे वेगळेपण मांडलेले आहे. ग्रामीण कथेची वाटचाल स्पष्ट करुन त्यात व्यंकटेश माडगूळकरांचे महत्वपूर्ण स्थान कसे आहे? ते आलेले आहे. पूर्वसूरींच्या ग्रामीण कथेपेक्षा त्यांच्या कथेचे वेगळेपण दाखवून दिले आहे. पूर्वसूरीच्या कथालेखनात दुर्लक्षित राहिलेल्या, ज्याच्याकडे कुणाचेही लक्ष गेलेले नव्हते अशा प्राणिजीवनाच्या चित्रणाला कथेमध्ये व्यकटेश माडगूळकरांनीच प्रथम स्थान दिले. प्राणिजीवनावरील कथा हे व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेचे एक महत्वाचे वैशिष्टय आहे. वैशिष्टयपूर्ण प्राणी त्यांच्या प्रत्येक कथेमध्ये कोणत्यातरी निमित्ताने निवेदनाच्या ओघात आलेले दिसतात. व्यंकटेश माडगूळकर हे मराठी साहित्यातील एकमेव कलावंत साहित्यिक आहेत की, ज्यांच्या कथासाहित्यातून खूप मोठया प्रमाणात प्राणिजीवन आलेले आहे. त्यांच्या कथेमध्ये वैविध्यता पहावयास मिळते. तसेच त्यांच्या नंतरच्या कथेमध्येही या कथांचे वेगळेपण उठून दिसते. त्यांच्या कथा ग्रामीण कथेमध्ये अग्रभागी

आहेत. याचा परामर्श घेतला आहे. मनुष्य जीवन आणि प्राणी यांचे पूर्वापार चालत आलेले सहसंबंध स्पष्ट केलेले आहेत. मानवी जीवनात प्राण्यांचे महत्व कसे वेगवेगळया प्रकारांनी आहे त्याचा विचार केलेला आहे. तसेच प्राणिकथा म्हणजे काय? हे स्पष्ट केलेले आहे. मनुष्य हा एक प्राणी आहे. मात्र ज्या कथांमध्ये मानवेत्तर प्राणी केंद्रस्थानी येतात व त्यांचे जीवनदर्शन घडवले जाते. त्यांना प्राणिकथा म्हणावयास हरकत नाही अशी प्राणिकथेची व्याख्या स्पष्ट केलेली आहे. तसेच प्राणिकथांचे स्वरुप, संकल्पना यांचा परामर्श घेतलेला आहे. प्राणिकथांमध्ये माणूस साक्षी असतो. तटस्थ राहून प्राणिजीवन न्याहाळतो. प्राचीन काळापासूनच प्राणिकथा अस्तित्वात असलेल्या पहावयास मिळतात. पंचतंत्र, हितोपदेश, इसापनीतीमध्ये, महाभारताच्या अनुशासनपर्वात, रामायणात या कथा आढळतात. जागतिक वाङ्.मयातही प्राणिकथा दिसतात. मराठीमध्येही व्यंकटेश माडगूळकर, जयंतराव टिळक, आनंद यादव, आप्पसाहेब खोत यांनी प्राणिकथा लिहल्या आहेत. परंतु त्यामध्ये व्यंकटेश माडगूळकरांच्या कथाच प्रभावी आणि परिणामकारक वाटतात. याचा आढावा घेतलेला आहे.

दुसऱ्या प्रकरणातून व्यंकटेश माडगूळकर व्यक्ती म्हणून कसे होते? त्यांचे वाङ्.मयीन जीवन, त्यांच्यावरती झालेले वाङ्.मयीन संस्कार, सामाजिक वातावरणातून घडत गेलेले त्यांचे व्यक्तिमत्व, त्यांच्या आवडीनिवडी यांचे वर्णन केलेले आहे. माणदेशच्या ग्रामीण जीवनात घालवलेले बालपण आणि त्यांनी अनुभवलेले प्राणिजीवन, निसर्ग, तेथील संस्कृती, शेती, पिके, श्रध्दा, अंधश्रध्दा, माणसांच्या वेगवेगळया तऱ्हा, दारिद्रय, दैन्य आणि बरड माळरान यांचा गंध त्यांच्या साहित्यातून दरवळताना दिसतो आहे. त्याचबरोबर त्यांचे चित्रकलेचे वेड आणि त्याचा साहित्यलेखनावरही झालेला परिणाम, चित्रकलेप्रमाणे साहित्यही चित्रदर्शी, जिवंत वाटते. त्यांचा शिकारीचा छंद, नंतर शिकार सोडून पशू–पक्षी निरीक्षणात रमलेले माडगूळकर आणि त्यामधून प्राणिजीवनाचा साहित्यामधून घेतलेला सूक्ष्म वेध महत्वपूर्ण असा वाटतो. अनेक साहित्यिकांशी त्यांचे जिव्हाळयाचे नातेसंबंध तयार झालेले होते. माणदेशच्या संस्कारातून त्यांच्या साहित्याला

विविधता येत गेली. त्यामुळे त्यांचे साहित्य समृध्द व संपन्न होत गेले. त्यांचा वाचनाचा व्यासंग आणि याचे साहित्यावर झालेले संस्कार दिसतात. अनेक पारितोषिक प्राप्त कथा त्यांनी लिहल्या. तसेच साहित्य अकादमीचा पुरस्कार त्यांच्या कादंबरीला मिळाला. तसेच साहित्य अकादमीचा पुरस्कार त्यांच्या कादंबरीला मिळाला. कथा–कादंबऱ्या इंग्रजी, रशियन, जर्मन, डॅनिश अशा परकीय भाषेत भाषांतरित झाल्या. त्याचप्रमाणे कानडी, उर्दू, हिंदी अशा भारतीय भाषांत भाषांतरे झाली आहेत.

चित्रकार, कथाकार, कादंबरीकार, नाटककार, चित्रपटकथालेखक, ललितगद्यलेखक, पशू–पक्षी निरीक्षक असे अष्टपैलू कामगिरी करणारे मराठी साहित्यातील अभिजात प्रतिभा लाभलेले कलावंत साहित्यिक म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. साहित्यिक म्हणून ते जे जगले, त्यांनी जे अनुभवले ते ते त्यांच्या साहित्याचा विषय बनलेले दिसते. याचे सविस्तर वर्णन या दुसऱ्या प्रकरणात केलेले आहे. तसेच त्यांच्या कथालेखनाची प्रेरणा आणि त्यांच्या प्राणिकथांचे निराळेपण यांचाही परामर्श या प्रकरणात घेतला आहे.

तिसऱ्या प्रकरणात व्यंकटेश माडगूळकरांच्या प्राणिकथांचा अभ्यास केलेला आहे. त्यांच्या एकूण वाङ्.यातील प्रमुख १७ कथांचा अभ्यास आणि इतर १४ कथांचा स्थूल अभ्यास केलेला आहे. तसेच त्यातील प्रमुख १७ प्राणिकथांच्या कथानकाचा विचार केलेला आहे. ‘काळया तोंडाची’, ‘एकटा’, ‘हस्ताचा पाऊस’, ‘परका’, ‘लढत’, ‘व्याघ्री’, ‘जंगल’ अशा १७ कथांच्या कथानकावर प्रकाश टाकलेला आहे. या कथांमधील निसर्गचित्रणात आलेली नाविन्यता आणि प्रभावीपणे व्यक्त झालेला निसर्ग कथेमध्ये महत्वाची भूमिका बजावतो. प्राणिजीवन आणि निसर्ग यांचा अतूट संबंध या प्राणिकथांमध्ये कसा आलेला आहे हे दाखविले आहे. तसेच या प्राणिकथांमध्ये मनुष्य आणि प्राणी यांचे सहसंबंध किती वेगवेगळया प्रकारे आले आहेत. मनुष्य आणि प्राणी यांचे परस्परावलंबित्व, ग्रामीण जीवनात प्राण्यांचे महत्व, मनुष्य आणि प्राणी यांचे जिव्हाळयाचे, शत्रुत्वाचे असे वेगवेगळे संबंध कसे आलेले आहेत. त्याचे विवेचन केलेले

आहे. प्राणिकथांमध्ये आलेले प्राणिजीवन हे विशिष्ट प्रदेशातील आहे. प्रदेश आणि प्राणिजीवन यांचा संबंध स्पष्ट केलेला आहे. माणदेश, धारवाडचे जंगल, पुणे परिसरातील असे विशिष्ट प्रदेशातील प्राणिजीवन या प्राणिकथांमधून पहावयास मिळते. लेखक पशू–पक्षी निरीक्षक असल्यामुळे त्यांच्या प्राणिनिरीक्षणातील बारकावे प्राणिकथांमध्ये दिसतात. प्राण्यांच्या सूक्ष्म हालचाली, त्यांच्या भावभावना, प्राण्यांची अचूक निरीक्षणे प्राणिकथांमधून उठून दिसतात. त्यांच्या कथांमधील प्राणी निरीक्षणातील वेगवेगळेपणाचा शोधही या प्रकरणात घेतलेला आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये व्यंकटेश माडगूळकरांच्या प्राणिकथांच्या वाङ्.मयीन विशेषांचा पदर उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. व्यंकटेश माडगूळकरांच्या प्राणिकथा वाङ्.मयीन वैशिष्टयांनी परिपूर्ण अशा आहेत. या कथांमधील निवेदनशैली वैशिष्टयपूर्ण असून ती सर्वोत्कृष्ट अशीच आहे. लहानलहान वाक्ये, कमी शब्दात मोठा आशय साधणारी सहजसंवादी निवेदनशैली प्राणिकथांमध्ये लक्ष वेधून घेते. माणदेशी बोलीभाषा आणि प्रमाणभाषा यांचा मिश्र वापर त्यांनी निवेदनासाठी केलेला दिसतो. पात्रांनुसार संवादाचे वेगळेपण जाणवते. प्राण्यांच्या भावाभिव्यक्तीचा अचूक वेध घेणारी, रसरशीत प्रत्ययकारी निवेदनशैली दिसते. तसेच निवेदनामध्ये प्राण्यांच्या आवाजाचाही यथोचित वापर केलेला दिसतो. संवेदनाप्रधान भाषा असल्यामुळे कथेत त्यांना जास्त वर्णन करावे लागत नाही. त्यामुळे प्राणिकथा नाविन्यपूर्ण वाटत राहतात. तसेच लेखकाने प्राण्यांना बोलते केलेले आहे. प्राण्यांचे मनोविश्लेषण या कथांमध्ये दिसून येते. याचाही परामर्श घेतला आहे. तसेच या प्राणिकथांमध्ये दिसून येते. याचाही परामर्श घेतला आहे. तसेच या प्राणिकथांमध्ये मानवी जीवनातील सत्तासंघर्ष, सुख–दुःख, आनंद, राग, लोभ, प्रेम, लज्जा अशा भावभावनांचे, मानवी जीवनाचे प्रतीकात्मक आरोपण प्राण्यांच्या जीवनावर केलेले दिसून येते. याचाही परामर्श घेतला आहे.

व्यंकटेश माडगूळकरांच्या प्राणिकथा या अभ्यासाचा विषय म्हणूनच त्या महत्वपूर्ण ठरतात. मानवी कथा इतकेच किंबहुना त्याहूनही अधिक प्रभावीपणे त्यांनी

प्राणिकथा लिहलेल्या दिसतात. कथेतील प्राण्यांचे व्यक्तित्व एखाद्या चित्रकाराने कुंचल्याच्या चार–दोन फटकाऱ्याने सुंदर चित्र काढावे, तसे रेखाटलेले पहावयास मिळते. म्हणूनच त्यांच्या प्राणिकथांना मराठी साहित्यात स्वतंत्र स्थान आहे.

व्यंकटेश माडगूळरांच्या व्यक्तिमत्वाचा व प्राणिकथांचा आढावा घेता पुढील निष्कर्ष हाती येतात.

१) साहित्यनिर्मिती ही जरी व्यक्तिगत बाब असली तरी व्यक्ती ज्या समूहात जीवन जगते त्या समूहाचे कलावंताच्या मनावरती सुप्त संस्कार झालेले असतात. त्यामुळे साहित्यातील व्यक्तिगत जीवनानुभव कलावंताच्या ओघानेच सामाजिक ठरतात.

२) व्यंकटेश माडगूळकरांचे वास्तव्य ज्या माणदेशच्या ग्रामीण परिसरात झाले ते ग्रामीण संस्कार, त्यांनी अनुभवलेले जीवन, त्यांच्यावर झालेले वाङ्.मयीन संस्कार यातून त्यांचे साहित्य साकारलेले आहे.

३) सुरुवातीला शिकारीमध्ये रमलेल्या माडगूळकरांच्या व्यक्तिमत्वाचे उन्नयन झाले. प्राण्यांविषयी त्यांना सहानुभूती वाटू लागली. त्यामुळे बंदूक टाकून देऊन, हातात दुर्बिण घेऊन आणि लेखणी घेऊन त्यांनी पशु–पक्षी निरीक्षण करण्यास सुरुवात केली. त्यातूनच सुंदर अशा प्राणिकथा साकारलेल्या आहेत.

४) प्राण्यांविषयी माणसाला कुतुहल वाटत असते. प्राणिकथेमध्ये वेगवेगळे प्राणी असतात. म्हणूनच कुतुहलापोटी माणूस प्राणिकथा वाचता राहतो. आणि कथेत रंगून जातो. वाचक पंचतंत्रातील, इसापनीतीमधील कथेपेक्षा व्यंकटेश माडगूळकरांच्या प्राणिकथांमध्ये जास्त रमताना दिसतात. 'गोष्ट' सारख्या कथेमधून याचे प्रत्यंतर येते.

५) प्राणिकथांतला प्राणी पूर्णपणे वाचकांच्या मनात वसतो. साजिवंतपणे दिसतो. आणि वाचकांच्या कायम स्मरणात ठसतो. जशी 'काळया तोंडाची' कथीतील चंपी कुत्री.

६) पाळीव माणसाळेलेले प्राणी, जंगलात वास्तव्य करणारे जंगली प्राणी, जलचर प्राणी असे अनेकविध प्राण्यांचे जीवन प्राणिकथांमध्ये आणलेले आहे. कुत्रा, गाय, बैल,

मांजर, घोडा, उंट, गाढव, रानडुक्कर, ससा, हरीण, अस्वल, चितळं, विरोळा, खार, कासव असे प्राणी वाचकांना आपलेसे वाटतात.

७) इसापनीतीमधील, पंचतंत्रातील प्राणी काही तरी बोध सांगण्यासाठी किंवा तत्व सांगण्यासाठी कथेमधून येतात. परंतु व्यंकटेश माडगूळकरांच्या प्राणिकथेमधून मानवी जीवनाशी प्राण्यांचे असलेले अतूट नाते, मालकाशी प्राण्यांचे असलेले विविध भावबंध स्पष्ट करणारे दिसते. ग्रामीण तसेच शहरी जीवनातील वाचकांच्या मनात प्राण्यांविषयक असलेले कुतुहल जागृत करुन त्याची परिपूर्ती या कथा करतात.

८) माडगूळरांच्या प्राणिकथा वाचकांची जिज्ञासापूर्ती करुन वाचकाला बोध देणाऱ्या, चिंतन करायला भाग पाडणाऱ्या, त्या प्राण्याला अभय देणाऱ्या अशा साधलेल्या आहेत.

९) त्यांच्या कथेतील बहुतेक प्राणी हे माणदेशातीलच आहेत. काही प्राणी शहरामध्ये घरी पाळलेलेही आहेत. तेही प्राणी माणसांच्या कुतुहलाचा विषय बनलेले दिसतात.

१०) व्यंकटेश माडगूळकरांच्या प्राणिकथांमधील प्राणिसृष्टी अतिशय समृध्द, वैविध्यपूर्ण असून ती मानवी जीवनाशी संबंधित असलेली तसेच मानवी अस्तित्वापासून दूर असणारी अशा अनेकविध स्वरुपाची आहे. विविध स्वरुपाचे हे प्राणी वेगवेगळया प्रकारांनी आपल्यासमोर येतात.

११) प्राणिकथेत प्राणी केंद्रस्थानी आणताना एक विशेष म्हणजे, तो प्राणी निवेदनाच्या ओघानेच कथेवर अधिराज्य गाजवतो. सुरुवातीलाच कथेमध्ये प्राणी येत नाही. प्राण्यांच्या आगमनासाठी वातावरण तयार करुन अनपेक्षितपणे कथेमध्ये प्राणी येतो आणि वाचकांना आकर्षित करतो.

१२) माडगूळकर त्रयस्थपणे प्राण्यांकडे बघून त्यांचे वेगळेपण मांडतात. वाचकाला त्या वातावरणात घेऊन जातात. वाचकांच्या मनाची पकड घेतात.

१३) प्राणी जिवंत असताना माणसाच्या मदतीला येतातच. त्याचबरोबर मेल्यानंतरही ते माणसांच्या उपयोगी पडताना दिसतात. हेही या कथांमधून स्पष्ट केलेले आहे. 'दुष्काळ' ही कथा याची प्रचिती देते.

१४) माणूस माणसाला विसरतो. पण पाळीव माणसाळेलेले प्राणी माणसाला कधीच विसरत नाहीत. प्राण्यांनाही माणसांचा लळा लागलेला असतो. खाल्लेल्या अन्नाला जागून ते इमानीपणे वागत असतात. माणसांशी लगट करत असतात. ज्यांच्या घरात त्यांचे वास्तव्य असते त्या माणसांविषयी प्राण्यांना वाटणारी ओढ व्यक्त होते. उदा. 'माझं गुणी जनावरं.'

१५) प्राण्यांविषयी माणसांच्या मनात श्रध्देची भावना कशी असते हेही या कथेमध्ये लेखकाने दाखवून दिले आहे. उदा. 'मारुतराया'.

१६) पाळीव प्राण्यांबद्दल माणसाला खूप प्रेम वाटत असले तरी ते पूर्णपणे निरपेक्ष नसते. त्यामागे काही ना काही स्वार्थ असू शकतो. अर्थार्जनासाठी माणूस प्राण्यांकडे अपेक्षेने पाहत असतो. शेळीला बोकडच व्हावे, गाईला खोंडच व्हावा असे वाटत असते. कारण तो विकून पैसे मिळणार असतात. त्यामुळे ही स्वार्थ भावना असते. बरीचशी कुटुंबे अर्थार्जनासाठी पूर्णपणे प्राण्यांवर अवलंबून असतात. प्राण्यांचे मानवी जीवनात असलेले महत्व या प्राणिकथांमधून स्पष्ट केलेले आहे. उदा. 'त्याची गाय व्याली' ही कथा.

१७) काही वेळेला मानवी जीवनातील अंधश्रध्देमुळे प्राण्यांच्या जीवनाची शेकांतिका होते. प्राण्यांना कसे दु:ख सहन करावे लागते, भटकत रहावे लागते. हेही या कथांमधून स्पष्ट होते.

१८) प्राणिकथा निसर्गवर्णनाच्या माध्यमातून विकसित होत जातात. प्राणी, निसर्ग आणि माणूस यांचा एकात्मतेने वेध या प्राणिकथांमध्ये घेतलेला दिसतो.

१९) माणूस आणि प्राणी यांच्यातील जिव्हाळयाचे, आपुलकीचे जिवाभावाचे नाते कसे बनते हे स्पष्ट होते. मनुष्य आणि प्राणी यांचे एक अनाम नाते त्यांच्या कथेत आपोआपच प्रकट होते.

२०) चित्रमयता, सूचकता, प्रतिकात्मता, अल्पाक्षररमणीयता, वाचकांच्या कुतुहलाला जागृत करणारी भाषाशैली, प्राण्यांचे माणसांशी मूक संवाद साधणे, थोडया शब्दात प्राण्याला साजिवंत करण्याची क्षमता ही वैशिष्टये प्राणिकथात दिसून येतात.

२१) प्राण्यांविषयी माडगूळकरांना सहानुभूती, प्रेम, आपुलकी वाटते. त्या प्रेमापोटीच प्राणिकथा त्यांनी लिहल्या आहेत. प्राण्यांच्या इमानदारपणामुळे त्यांच्याविषयी लेखकाला अधिक जवळीक वाटते. कारण एक वेळ माणूस माणसाशी वाईट वागेल. पण प्राणी मात्र शेवटपर्यंत आपल्या धन्याशी इमानदारीने वागतात. हे प्राणी पाळीव, शेतीच्या कामात उपयोगी पडणारे, हिंस्त्र पण माणसाळलेले कुठलेही असले तरी त्यांना प्रेमाने वागवावे. तेही आपल्यावर नक्की प्रेम करतील. अशा प्राण्यांची हत्या करुन नये हेही त्यांनी काही कथेतून सूचित केले आहे.

२२) जंगली प्राण्यांची शिकार करु नये. त्यांचे सवर्धन, जतन करावे. हेही सूचकपणे या कथांमधून येते.

२३) व्यंकटेश माडगूळकरांनी प्राणी हे माणसांचे आदिम वंशज वाटतात. म्हणूनच माणसातल्या आदिमतेचा प्राणिजीवनातून शोध ते घेताना दिसतात.

२४) माणसांच्या जीवनात जसे संघर्ष, प्रेम, सुख–दु:ख असते. लज्जा, मरण असते. तसेच ते प्राणिजीवनातही असते. माणसांइतकेच प्राण्यांचे जीवनही महत्वाचे असते. हेही सूचित होते.

२५) प्राण्यांची जीवन जगण्याची साचेबंद सवय, त्यांचे दैनंदिन जीवनक्रम या गोष्टी त्यांनी अचूकपणे टिपलेल्या आहेत.

२६) या प्राणिकथा वास्तववादी, परिणामकारक वाटतात. प्राणी साजिवंतपणे या कथांमध्ये प्रकटलेले आहेत. प्रत्येक प्राणी त्याचा जीवनधर्म पाळणारा आहे. प्राण्यांचे वेगळेपण, मोठेपण, निसर्गातील त्यांचे असणे हे केंद्रस्थानी ठेवूनच ते लिहतात.

२७) निसर्ग, पर्यावरण यांना जतन करावे असेही सूचकपणे या कथा सांगतात.

२८) माणूस आणि प्राणी यांचे जिव्हाळयाचे संबंध असतात. तसेच काही वेळा प्राणीही माणसाशी शत्रुत्व करताना दिसतात. विशिष्ट कारणामुळे हे घडते. 'एकटा', 'मारुतराया' या कथेतून याची प्रचिती येते.

२९) या प्राणिकथांमधील काही कथांमधून 'कुत्रा' हा पाळीव प्राणी बऱ्याच वेळेला आलेला दिसतो. 'काळया तोंडाची', 'एकटा', 'दुष्काळ', 'कुत्री', 'अकाली गेलेला जीम' अशा कथांमधून कुत्रा हा प्राणी केंद्रस्थानी आहे. विशेषत: लेखकाला कुत्र्याविषयी जास्त सहानुभूती असलेली दिसते. कुत्र्याविषयीचा बारकावा त्यांनी खूप चांगल्या रीतीने शब्दबध्द केलेला आहे. त्यांचे मनोविश्लेषण उत्कृष्ट पध्दतीने रेखाटले आहे.

३०) माडगूळकरांच्या प्राणिकथांमध्ये शेती व्यवसायाला पूरक असणाऱ्या प्राण्यांचा उल्लेख कमी प्रमाणात आलेला दिसतो. जसा बैल हा प्राणी अपवाद 'धनाजी' कथेतील जहागीर बैल.

३१) पाळीव प्राण्यांमधील शेतकऱ्याच्या उपयोगाचे काही प्राणी त्यांच्या प्राणिकथांत दिसत नाहीत. उदा. म्हैस, रेडा, शेळी इत्यादी

३२) या प्राणिकथांमध्ये प्राण्यांच्याबरोबर पक्षीजीवनही तितक्याच प्रभावीपणे आलेले दिसते. चिमण्या, राघू, कावळा, टिटवी, ढोक, हरेल, धनछडया असे पक्षी त्यांचे आवाज, रंग, रुप, यांच्यासह कथेमध्ये चित्रित केलेले आहेत. 'त्याची गाय व्याली', 'लढत' अशा कथांत हे पक्षीजीवन प्रभावीपणे रंगवलेले आहे.

३३) व्यंकटेश माडगूळकर प्राणिकथा लिहिताना निसर्ग आणि प्राणी असा फरक करीत नाहीत. उलट त्याचे एकजीव झालेले मिश्रण कथेशी तादात्म्य पावून पूर्ण

ताकदीनिशी उतरतात, त्यामुळे मानवविरहित कथा इतर कथाहून मोठे यश संपादन करतात.

३४) माडगूळकरांच्या प्राणिकथा हया लिहल्या गेल्या नसून त्या त्यांच्या प्रतिभेतूनच साकार झालेल्या दिसतात. या कथातील एकही शब्द अथवा प्रसंग अनावश्यक अथवा अनाठायी वाटत नाही.

३५) माडगूळकरांचे व्यक्तिमत्व माणसापेक्षा प्राणिमात्रांच्या अधिक जवळ गेलेले या कथांमधून दिसून येते. त्यांची चिंतनशील वृत्ती, निसर्गात रमणारे मन आणि निसर्गघटकांना संकलित करणारी त्यांची प्रतिभा अलौकिक अशीच होती. म्हणूनच ते इतक्या प्रभावी प्राणिकथा लिहू शकले.

## समारोप

व्यंकटेश माडगूळकरांच्या प्राणिकथा हा मराठी साहित्यातील एक दुर्मिळ ठेवा असून कथांमधील प्राणी ते साजिवंतपणे उभा करतात. त्यांच्या हालचाली, त्यांचे निसर्गात मिसळणे, त्यांचे मनोविश्लेषण, त्यांचे जगणे आणि मरणे सचेतन बनवितात. मानवी जीवनाचे आरोपण त्यात समर्थपणे येते. कथेत प्राणी हे केंद्रस्थानी असल्याने कथेला एक उंची प्राप्त होते. प्राण्यांचे मानवी सहसंबंध, माती, पर्यावरण यांचे दृढ नाते या कथांमधून अनुभवास येते. लेखकाचे प्राणिनिरीक्षण आणि निवदेनशैली वैशिष्टयपूर्ण असून त्यांच्या प्राणिकथा मराठी साहित्यातच काय परंतु जागतिक साहित्यात उठून दिसतील अशा श्रेष्ठ दर्जाच्या आहेत. असे या अभ्यासावरुन निश्चित म्हणता येते.